**श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८**

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

दिनांक: २८ ऑक्टोबर, २०२६

# दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

## विषय: आकर्षक फुलांची सजावट करून घेण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविणेबाबत.

**रविवार, दि. ११ ऑक्टोबर, २०२६ ते मंगळवार, दि. २० ऑक्टोबर,२०२६ (शारदीय नवरात्रोत्सव निमित्त मंदिरात नवरात्रीय रंगोत्सव व दसरा), दि. ८ नोव्हेंबर, २०२६ (नरक चतुर्थी व लक्ष्मी पूजन) व दि. १० नोव्हेंबर, २०२६ (बलिप्रतिपदा, दीपावली पाडवा)** या दिवसांमध्ये आकर्षक फुलांची सजावट करून घेण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

**अटी व शर्ती :–**

१. शनिवार, दि. ०३ ऑक्टोबर, २०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत दोन मोहोरबंद लिफाफे (तांत्रिक व मूल्य) लाखेने सिलबंद करून प्रतिक्षालयाच्या तळ मजल्यावर टपाल कार्यालयात सादर करावेत.

२. मंगळवार, दि. ०६ ऑक्टोबर,२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजता न्यासाच्या तिसऱ्या मजल्यावरील समिती कक्षात मोहोरबंद दरपत्रकांचे लिफाफे उघडण्यात येतील.

३. तांत्रिक कागदपत्रे (Technical Document) व मूल्य दर (BOQ) असे दोन लिफाफे मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकारांनी तांत्रिक कागदपत्रे लिफाफा व मूल्य दर लिफाफा असे दोन वेगवेगळे लिफाफे सादर करावयाचे आहे.

४. ए–४ साईजचे मोठे लिफाफे लाखेने सिलबंद करून न्यासास सादर करावे. तसेच लिफाफ्यामधील मुल्य दर व तांत्रिक कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे. लिफाफ्याचा एका बाजूला दरपत्रकधारकाचे संपूर्ण नाव, पत्ता व संपर्क क्रमांक लिहिण्यात यावे तसेच दुसऱ्या बाजूला श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास प्रभादेवी, मुंबई, देखभाल व दुरूस्ती विभाग असे लिहावे.

५. दरपत्रक सादर करताना सोबत जोडावयाची कागदपत्रे.

अ) कंपनी नोंदणी दाखला (महाराष्ट्र दुकाने व आस्थापना किंवा उद्यम रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट)

ब) पॅनकार्ड.

क) मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र (आर्थिक वर्ष २०२२–२३, २०२३–२४ व २०२४–२५)

ड) फुलांची सजावट करण्याबाबतचा अनुभवाचा दाखला. (किमान ३ वर्षाचा असावा याकरीता प्रत्येक वर्षाचे किमान एक कामाचे कार्यादेश/कामाचे देयक जोडावे)

या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत जोडाव्यात. अन्यथा दरपत्रकधारकाला अपात्र ठरविण्यात येईल.

६. दरपत्रकधारक हा हिंदू असावा.

७. दरपत्रक उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत सोबत घेउन येणे.

८. ज्यादिवशी मोहोरबंद दरपत्रक लिफाफे उघडण्यात येणार आहे त्या दिवशी दरपत्रकधारकाच्या प्रतिनिधिंनी उपस्थित राहणे गरजेचे आहे. जर दरपत्रकधारकाचा प्रतिनिधी गैरहजर राहिल्यास सदर बैठकीत अटी व शर्तीमध्ये काही बदल, सुधारणा व शिथिल करण्याचा निर्णय न्यासाने घेतल्यास आपणास तो निर्णय मान्य करावा लागेल. याबाबत आपली कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

९. दरपत्रकधारकारांनी BOQ मधील (पान क्र. ४ व ५ वरील) सर्व संभाव्य बाबींचा साकल्याने विचार करून (उदा. लेबर मजूरी व वाहतूक खर्च) मुल्य दरामध्ये समाविष्ट करून रक्कम भरावी.

१०. दरपत्रकधारकाचे दुकान/फर्म/कंपनी किमान २ वर्षापूर्वीची असणे आवश्यक आहे.

११. दरपत्रकधारकाकडे देवस्थान, चॅरीटेबल ट्रस्ट, नामांकित कंपन्या, शासकीय, निम शासकीय, महानगर पालिका, संस्था तसेच अन्य मोठया धार्मिक समारंभात / ठिकाणी दरपत्रकात नमूद केलेल्या कामाच्या अनुषंगाने काम केलेल्याचा अनुभव असावा. यासंबधातील प्रमाणपत्र/दाखला किंवा कार्यादेशाची पुरवठा आदेश/देयके यांपैकी एकाची प्रत तांत्रिक लिफाफ्या मध्ये सादर करणे बंधनकारक आहे.

१२. काम सुरू असताना निष्काळजीपणामुळे कोणत्याही प्रकारच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास न्यासामार्फत आपणाकडून नुकसान भरपाईची रक्कम बिलातून वजा करण्यात येईल.

१३. श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास L-1 दरपत्रकधारकाचे काम असमाधानकारक असल्यास आवश्यकतेनुसार L-2 दरपत्रकधारकाला कार्यादेश देवू शकतो.

१४. दरपत्रक भरतांना सर्व प्रकारचे खर्चासह (लेबर व वाहतूक खर्च) भरून रक्कम भरावी.

१५. कार्यादेशाप्रमाणे काम करीत असल्याबाबत परिक्षण करण्याचा न्यासाला पूर्ण अधिकार राहील.

१६. प्रचलित अधिनियम/नियमातील तरतूदीनुसार देयकामध्ये आवश्यक ती कर कपात केली जाईल.

१७. नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१८. काम पूर्ण झाल्यानंतर बिलाची रक्कम आरटीजीएस मार्फत अदा करण्यात येईल. कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१९. कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या पर्यवेक्षण करणाऱ्या व्यक्तीने न्यास प्रशासनासोबत समन्वय साधणे आवश्यक राहील.

२०. दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या कामामध्ये ५% ते १०% काम कमी जास्त प्रमाणात कपात करणे किंवा वाढविणे याचा अधिकार न्यासाकडे राहील.

२१. दरपत्रकातील नमूद बीड ऑफ कोटेशन (BOQ) व्यतिरिक्त वाढीव काम करणे आवश्यक असल्यास अशा स्वरूपाचे अतिरिक्त काम कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने करण्यात यावे.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

२२.ऐनवेळी झालेल्या अतिरिक्त कामाचे प्रदान दरपत्रकधारकाने दिलेल्या दरानुसारच करण्यात येईल. न्यास प्रशासनाने काम प्रमाणित केल्यानंतर व त्यास मान्यता दिल्यानंतर बिलाची अंतिम रक्कम अदा करण्यात येईल.

२३.दरपत्रकात नमूद केलेल्या कामासाठी कंत्राटदाराने दुसऱ्या उप कंत्राटदारास काम न देता सदरील काम स्वत: करणे बंधनकारक राहील. उप कंत्राटदारास काम दिल्याचे निदर्शनास आल्यास बिलातून २५% रक्कम वजा करण्यात येईल. याबाबत योग्य ती खबरदारी घ्यावी.

२४.कंत्राटाबाबत काही वाद उपस्थित झाल्यास तो प्रथम मुंबई कार्यक्षेत्रातील लवादा (आरबीट्रेशन) मार्फत त्यावरून निवाडा करण्यात येईल. लवादामधील निर्णय अमान्य राहिल्यास मुंबई कार्यक्षेत्रातील न्यायालयाकडे जाता येईल.

२५.उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार समितीने राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

२६.दरपत्रकामधील अटी शर्तींचा व कागदपत्रांचा अभ्यास करून ई–निविदा सादर करावी. ई–निविदेसंबंधी काही शंका असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

**अ. श्रीमती. राखी चव्हाण, कार्यकारी अधिकारी – मोबाईल क्रमांक. ९७०२५४८२०४**

**ब. श्री. शाम वाघ, वि.व लेखाअधिकारी तथा प्र. उप कार्यकारी अधिकारी – मोबाईल क्रमांक. ९८२१८६६२०५**

**क. श्री. जनार्दन शिरवडकर, पर्यवेक्षक – मोबाईल क्रमांक. ९८६७७२०१११**

**ड. श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालय**
**दूरध्वनी क्र. ०२२–६२४९११११, ०२२–६२४९१११२**

**(राखी चव्हाण)**
**कार्यकारी अधिकारी**

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## दरपत्रकाचा तपशील

| अ. क्र. | दिनांक | वापरण्यात येणारी फुले व इतर वस्तूंचा तपशील | एकूण नग | रक्कम (कर वगळून) |
|---|---|---|---|---|
| १ | ११ ऑक्टोबर २०२६ | १०० केसरी जरबरा, १० बंडल कामीनी पत्ता, २५ नग झावळी, २ बंडल जीप्सो, ४ स्पंज, २ मीटर जाळी इत्यादी वस्तू वापरुन २X१ मीटरचा बुकेचा पट्टा बनवून गाभारा बाहेरील लावणे | २० बुके | |
| २ | १२ ऑक्टोबर २०२६ | १०० पांढरा जरबरा, १० बंडल कामीनी पत्ता, २५ नग झावळी, २ बंडल जीप्सो, ४ स्पंज, २ मीटर जाळी इत्यादी वस्तू वापरुन २X१ मीटरचा बुकेचा पट्टा बनवून गाभारा बाहेरील लावणे | २० बुके | |
| ३ | १३ ऑक्टोबर २०२६ | १०० लाल जरबरा, १० बंडल कामीनी पत्ता, २५ नग झावळी, २ बंडल जीप्सो, ४ स्पंज, २ मीटर जाळी इत्यादी वस्तू वापरुन २X१ मीटरचा बुकेचा पट्टा बनवून गाभारा बाहेरील लावणे | २० बुके | |
| ४ | १४ ऑक्टोबर २०२६ | १० बंडल नीळा ऑर्चिड, १० बंडल कामीनी पत्ता, २५ नग झावळी, २ बंडल जीप्सो, ४ स्पंज, २ मीटर जाळी इत्यादी वस्तू वापरुन २X १ मीटरचा बुकेचा पट्टा बनवून गाभारा बाहेरील लावणे | २० बुके | |
| ५ | १५ ऑक्टोबर २०२६ | १०० पिवळा जरबरा, १० बंडल कामीनी पत्ता, २५ नग झावळी, २ बंडल जीप्सो, ४ स्पंज, २ मीटर जाळी इत्यादी वस्तू वापरुन २X१ मीटरचा बुकेचा पट्टा बनवून गाभारा बाहेरील लावणे | २० बुके | |
| ६ | १६ ऑक्टोबर २०२६ | १०० हिरवा जरबरा, १० बंडल कामीनी पत्ता, २५ नग झावळी, २ बंडल जीप्सो, ४ स्पंज, २ मीटर जाळी इत्यादी वस्तू वापरुन २X१ मीटरचा बुकेचा पट्टा बनवून गाभारा बाहेरील लावणे | २० बुके | |
| ७ | १७ ऑक्टोबर २०२६ | १०० राखाडी जरबरा, १० बंडल कामीनी पत्ता, २५ नग झावळी, २ बंडल जीप्सो, ४ स्पंज, २ मीटर जाळी इत्यादी वस्तू वापरुन २X१ मीटरचा बुकेचा पट्टा बनवून गाभारा बाहेरील लावणे | २० बुके | |
| ८ | १८ ऑक्टोबर २०२६ | १०० जांभळा जरबरा, १० बंडल कामीनी पत्ता, २५ नग झावळी, २ बंडल जीप्सो, ४ स्पंज, २ मीटर जाळी इत्यादी वस्तू वापरुन २X१ मीटरचा बुकेचा पट्टा बनवून गाभारा बाहेरील लावणे | २० बुके | |
| ९ | १९ ऑक्टोबर २०२६ | ४ बंडल नीळा ऑर्कीड , ६० मोरपंखी जरबरा, १०बंडल कामीनी पत्ता,२५ नग झावळी ,२ बंडल जीप्सो, ४ स्पंज, २ मीटर जाळी इत्यादी वस्तू वापरुन २X १ मीटरचा बुकेचा पट्टा बनवून गाभारा बाहेरील लावणे | २० बुके | |

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | दि. २० ऑक्टोबर, २०२६ (दसरा) | गोंडा (नेकलेस तोरण)–२६० किलो, शेवंती (नेकलेस तोरण)–५० किलो, कापरी गोंडा–२० किलो, अशोक पाला–१५० बंडल, जरबरा–१०० बंडल, ऑर्चिड–२५ बंडल, गुलाब–४० बंडल, कार्निशन–२० बंडल, अंन्थोरिअम–२० नग, बटन शेवंती–२५ बंडल, डेझी–२५ बंडल, कामिनी–१५० बंडल, २ जोडी केळयाचे खांब, ओयासिस–३ बॉक्स, जाळी–५ किलो, सुतळ–३ किलो, लिडर–१५ नग ही सर्व फुले वापरुन सजावट करणे | — | |
| ११ | दि. ०८ नोव्हेंबर, २०२६ नरक चतुर्दशी व लक्ष्मीपूजन | गोंडा (नेकलेस तोरण)–२६० किलो, शेवंती (नेकलेस तोरण)–५० किलो, कापरी गोंडा–२० किलो, अशोक पाला–१५० बंडल, जरबरा–१०० बंडल, ऑर्चिड–२५ बंडल, गुलाब–४० बंडल, कार्निशन–२० बंडल, अंन्थोरिअम–२० नग, बटन शेवंती–२५ बंडल, डेझी–२५ बंडल, कामिनी–१५० बंडल, २ जोडी केळयाचे खांब, ओयासिस–३ बॉक्स, जाळी–५ किलो, सुतळ–३ किलो, लिडर–१५ नग ही सर्व फुले वापरुन सजावट करणे | — | |
| १२ | दि. १० नोव्हेंबर, २०२६ बलिप्रतिपदा व दिपावली पाडवा | गोंडा (नेकलेस तोरण)–२६० किलो, शेवंती (नेकलेस तोरण)–५० किलो, कापरी गोंडा–२० किलो, अशोक पाला–१५० बंडल, जरबरा–१०० बंडल, ऑर्चिड–२५ बंडल, गुलाब–४० बंडल, कार्निशन–२० बंडल, अंन्थोरिअम–२० नग, बटन शेवंती–२५ बंडल, डेझी–२५ बंडल, कामिनी–१५० बंडल, २ जोडी केळयाचे खांब, ओयासिस–३ बॉक्स, जाळी–५ किलो, सुतळ–३ किलो, लिडर–१५ नग ही सर्व फुले वापरुन सजावट करणे | — | |
| | | एकूण रक्कम रुपये | — | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का